# परिशिष्टे :

# परिशिष्टे:

१. अश्विनी धोंगडे ह्यांचे छायाचित्र :



## २. अश्विनी धोंगडे ह्यांचा जीवनपट

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नाव | : | डॉ. सौ. अश्विनी रमेश धोंगडे |
| २) | पत्ता | : | 'शरण्य', ४७, स्वेदगंगा सोसायटी, वारजे, पुणे ४११०५२. |
| ३) | जन्मतारीख | : | २१ जानेवारी १९४७ |
| ४) | शिक्षण | : | एम्. ए. (इंग्रजी) पीएच्.डी. |
| ५) | व्यवसाय | : | पुणे येथील एस्.एन्.डी.टी. महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे अध्यापन १९७० सालापासून. १९९२ पासून प्राचार्य (निवृत्त - फेब्रुवारी २००७ पासून) |
| ६) | परदेशप्रवास | : | उत्तर कोरिया, मॉस्को, अमेरिका, फिनलँड, फ्रान्स व अन्य युरोपीय देश |
| ७) | प्रकाशित पुस्तके: | | कादंबऱ्या - १. पाषाणपुरुष, २. स्पर्श, ३. होरपळ, ४. जमीन<br>कथासंग्रह - १. मनस्वी<br>कवितासंग्रह :१. स्त्रीसूक्त (१९८८), २. अन्वय (१९९२), ३. अपौरूषेय (१९९८)<br>समीक्षा :<br>१. मराठी भाषा आणि शैली (विभागून १९८५)<br>२. स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन (१९९३)<br>३. संदर्भ स्त्रीपुरूष (२००३) |

ललितलेख संग्रह :

१. वर्तमान (१९९७), २. जगणे व्हावे सुंदर म्हणूनी

प्रवासवर्णन १. देशांतर,२. मध्यरात्रीच्या सूर्याचा देश (२००५)

बालकुमार साहित्य :

१. झुक झुक पॉग पॉग, २. जादुचा कंठा, एक होते झाड,

३. दुऱ्यासाठी जगलास तर, ४. बिलंदर बारीकराव,

५. अल्बर्ट आईन्स्टाईन, ६. यशच्या कल्पक कथा व अन्य

१५ पुस्तके

एकांकिका :

१. ये रे घना, २. अनुत्तरीत, ३. मी न माझा आरसा

अनुवाद :

सडकछाप - मेहेर पेस्तनजी (इंग्रजी) पेंग्विन पुब्लिकेशन

८. **पारितोषिके आणि सन्मान :**

१. महाराष्ट्र शासन, मराठी वाङ्मयनिर्मितीचा राज्यपुरस्कार, कवी केशवसुत पारितोषिक - स्त्रीसूक्त १९८८-८९.

२. महाराष्ट्र साहित्य परिषद श्रेष्ठता पारितोषिक - कविवर्य कुसुमाग्रज पुरस्कार - स्त्रीसूक्त १९८८

३. महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद, पुणे 'गदिमा' साहित्य पुरस्कार अपौरूषेय १९९९

४. श्री यशवंतराव चव्हाण मित्रमंडळाचा कवितासंग्रहासाठीचा पुरस्कार, 'स्त्रीसूक्त' १९८९.

५. उत्कृष्ट समीक्षेसाठी महाबँक पुरस्कार - मराठी भाषा आणि शैली १९८८

६. मराठी बालकुमार साहित्य संमेलन - 'आजचे बालसाहित्य' प्रथम पुरस्कार

७. लोकहितवादी मंडळ, नाशिक सर्वोत्कृष्ट एकांकिका - ये रे घना

८. सर्वोत्कृष्ट एकांकिका, युगवाणी नागपूर - अनुत्तरित

९. बंधुता प्रतिष्ठान - प्रेरणा पुरस्कार १९९९

१०. डॉ. हेमंत इनामदार आदर्श शिक्षक पारितोषिक

११. भगिनी निवेदिता प्रतिष्ठान 'शारदा' पुरस्कार 'देशांतर'साठी

१२. दयार्णव कोपार्डेकर पुरस्कार 'यशाच्या कल्पक कथा'

१३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार मार्च २००४

१४. ललितेतर वैचारिक प्रकारात लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख पारितोषिक - म. सा. परिषदेतर्फे - संदर्भ स्त्री-पुरूष २००५

## ९. सार्वजनिक कार्य :

१. महाराष्ट्र साहित्य परिषद कार्यकारिणी सदस्य २००१ पर्यंत

२. साहित्यप्रेमी भगिनी मंडळ कोषाध्यक्ष म्हणून दहा वर्षे काम.

३. मराठी बालकुमार साहित्य संमेलन कार्यकारी सदस्य १९९० पर्यंत

४. मुलांच्या मासिकाचे संपादन

१०. बृहन् महाराष्ट्रामध्ये महाविद्यालये, विद्यापीठे सार्वजनिक संस्था, स्त्रीयांची मंडळे त्यामध्ये स्त्रियांचे प्रश्न व स्त्रियांचा दर्जा या संबंधित विषयांवर सुमारे २०० हून अधिक व्याख्याने.

११. आतापर्यंत सर्व प्रतिष्ठित कविसंमेलने, साहित्य संमेलने ह्यातून सुमारे १०० ठिकाणी कवितावाचन.

१२. महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या स्त्रियांच्या सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न, व्याख्यानमाला व अन्य उपक्रम

१३. मराठीतील सर्व वृत्तपत्रे, मासिके ह्यामधून नियमितपणे कथा, कविता, समीक्षा, लेख प्रसिद्ध. काही वृत्तपत्रांमधून तरुणांच्या प्रश्नावर नियमित सदर लेखन.

१४. देशांतर - धारवाड विद्यापीठात पाठ्यपुस्तक

१५. स्त्रीसूक्त - उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पाठ्यपुस्तक

१६. 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप व उपयोजन', पुणे, मुंबई, नागपूर, कोल्हापूर विद्यापीठात एम.ए. संदर्भग्रंथ

१७. 'स्त्रीसूक्त'मधील कवितांचा पाठ्यपुस्तकात समावेश.

## ३. अश्विनी धोंगडे ह्यांची मुलाखत

**स्त्रीवादी भूमिका घेवून, पारंपरिक मूल्यांना छेद देणारी, माझा म्हणून खास ठसा उमटवणारी, माझी कविता वेगळी आहे. – अश्विनी धोंगडे**

''मी माझ्या कवितेत जाणून बुजून
प्रयोग केलेले आहेत
'स्त्रीजीवन' ह्या एकाच विषयावर मी
कविता लिहिल्या आहेत.

'स्त्रीसूक्त' (१९८८) व 'अन्वय' (१९९२) ह्या दोन काव्यसंग्रहांच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करावयाच्या प्रबंधिकेच्या निमित्ताने ९ जुलै २००६ रोजी घेतलेली अश्विनी धोंगडे ह्यांची विशेष मुलाखत. अश्विनीताई शातंपणे आपला प्राचार्यपदाचा कार्यभार सांभाळत होत्या. आवेश नाही, अविर्भाव नाही, संवेदनशील मन.... एकेक शब्द योग्य, ठामपणे उमटत होता. श्रोता फक्त एकच स्वत: मी. स्थळ श्रीमती नाथीबाई दामोदर ठकारसी महिला विद्यापीठ, पुणे, प्राचार्य केबिन.

अश्विनीताईंच्या आवाजात कणखरपणा जाणवत होता. प्रत्येक शब्द प्रेरणादायी वाटत होता. प्रबंधिकेसाठी खास मुलाखत घेण्याच्या निमित्ताने झालेली ही भेट स्त्रीवादी कवितेचे दर्शन घडविणारी ठरली.

माझं मन भूतकाळात गेलं कडेगाव येथील 'स्त्रीवादी साहित्य संकल्पना आणि स्वरूप' ह्या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राचे अश्विनीताईंचे बीजभाषण मी ऐकले होते. स्त्रीवाद, स्त्रीवादी भूमिका, स्त्रीवादी साहित्य, हे त्यांनी आपल्या भाषणात प्रभावीपणे, मार्मिकपणे

मांडले होते. संशोधन विषय निवडण्याची प्रक्रिया माझ्या मनामध्ये सुरू असताना चर्चासत्राच्या निमित्ताने अश्विनीताईंचा परिचय झाला आणि एम.फिल. प्रबंधिकेच्या निमित्ताने प्रत्यक्ष संवाद साधता आला.

'स्त्रीसूक्त' (१९८८), 'अन्वय' (१९९२), तसेच 'अपौरुषेय' काव्यसंग्रह (१९९८), कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, ललितलेख संग्रह, बालकुमार साहित्य व समीक्षालेखन असे विविध साहित्यप्रकार हाताळले असले, तरी 'स्त्रीसूक्त' ह्या काव्यसंग्रहांमुळे अश्विनी धोंगडे ह्यांना पारितोषिके, शासनाचा पुरस्कार, मान-सन्मान, कवयित्री म्हणून प्रसिद्धी मिळाली म्हणून मी विचारलं.

**प्रश्न १ : कवयित्री म्हणून तुमची जडणघडण कशी झाली? 'स्त्रीसूक्त'च्या निर्मितीप्रक्रियेविषयी थोडक्यात आपला अनुभव काय?**

वयाच्या दहा-बारा वर्षापासून मी कविता लिहू लागले. सुरवातीच्या काळात या कविता अनुकरणात्म होत्या. महाविद्यालयात असताना मराठीचे प्राध्यापक डॉ. वि.वि. पटवर्धन यांनी माझी एकदा चांगलीच कानउघडणी केली व 'मला जे मनापासून वाटेल तेच मी लिहावं मग ते वेडवाकड असलं तरी त्याला प्रामाणिकपणाचा वास असेल असं बजावलं. परिणामत: पुढे स्वत:ला प्रेमात झोकून देणाऱ्या, चंद्र चांदण्या फुलं यांच्या साक्षी काढणाऱ्या गोड-गोड कविता मी लिहू लागले. त्या मासिकातून प्रसिद्धही झाल्या. पुढे कथा, कादंबऱ्या, अनुवाद यांच्या आकर्षणानं कविता मागे पडली, पण कधी कधी मात्र स्वत: पुरत्याच कविता लिहून मी मला मोकळं करत होते. तारुण्यातल्या बहराच्या प्रेमकवितेनंतर मध्ये जवळ-जवळ वीस वर्षाच्या काळानंतर आकाशातला एखादा नवा तारा अचानक नजरेच्या टप्प्यावर यावा,

तशी मला एक नवी कविता दिसली आणि दोन महिन्याच्या कालावधीत मी झपाटल्यासारख्या कविता लिहित गेले. 'स्त्रीसूक्त' हे समर्पक नावही मला असंच झोपेतून उठता उठता सुचलं.

**प्रश्न २ : आपल्या कवितांचे वेगळेपण स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करण्यामध्ये आढळते? त्यामागील आपली भूमिका काय?**

पारंपरिक मूल्यांना छेद देणारी माझी कविता वेगळी आहे. 'स्त्रीसूक्त' मधील 'फिर्याद' ही पहिलीच कविता माझी स्त्रीवादी जाणिवा, काव्यविषय भूमिका व्यक्त करण्यास पुरेशी आहे. प्रेमाच्या भाकडकथा रंगविणारी, अलंकरणात अडकून पडलेली. स्वप्नात रमणारी कविता माझ्या रोषास कारणीभूत ठरली ज्या प्रकारच जीवन मी गेली वीस वर्षे जगत होते. माझ्या अवती भोवतीच्या स्त्रियांच्यात पाहात होते. त्यांच्याशी बोलत होते, त्या पार्श्वभूमीवर कोणतीच मराठी कविता मला माझी वाटत नव्हती. सौंदर्यप्रदर्शनाला बळी पडणाऱ्या सिनेमातल्या,जाहिरातीतल्या आणि एकूणच भोगवादी संस्कृतीतल्या विकाऊ स्त्रिया आणि दुसऱ्या बाजूला १९७५ ते १९८५ या स्त्रीमुक्ती दशकाच्या निमित्ताने स्त्रियांचं दारिद्रय, दुभंगलेपण, दुय्यमत्त्व, पितृसत्ताक वर्चस्वाखाली होणारी पिछेहाट याबद्दल प्रसिद्ध होणारी वृत्ते वाचनात आल्यावर 'आपण कोण' आपला जन्म स्वत:साठी की आणखी कुणासाठी' असले प्रश्न भेडसावू लागले, त्यातूनच या कवितांचा जन्म झाला. या कविता जसा माझा चेहरा प्रतिबिंबित करतात, तसा सर्व स्त्रीजातीचा चेहरा प्रतिबिंबित करतात, म्हणून त्या व्यक्तिगत नाहीत जातीगत आहेत. तसेच त्या केवळ स्त्रीवादी भूमिका घेऊन सतत पुरूषांवर टीका करणाऱ्या नाहीत, तर स्त्रीमनात डोकावून स्त्रियांच्या वृत्तीतला खुजेपणाही मोकळेपणानं सांगणाऱ्या आहेत. मुख्य म्हणजे आजच्या स्त्रीचं जीवन वास्तवपणे कुठेतरी पकडून ठेवण्याची धडपड त्यात आहे.

**प्रश्न ३ : मराठी कवितेत सर्वप्रथम स्त्रीवादी जाणिवा कोणत्या कवयित्रींच्या काव्यसंग्रहांमधून व्यक्त झाल्या? तुमच्या मते स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणाऱ्या अन्य मराठी कवयित्री कोण?**

१९७९ मध्ये प्रसिद्ध झालेला मलिका अमर शेखचा 'वाळूचा प्रियकर' हा काव्यसंग्रह मराठीतील पहिला काव्यसंग्रह स्त्री शरीराच्या जाणिवा खणखणीत स्पष्ट शब्दात व्यक्त करणारा आहे. मलिका अमर शेख, नीरजा, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे, अंजली कुलकर्णी, अंजली पेंडसे या स्त्रीकवींच्या कवितांमधून एकसंघ खंबीर अशी स्त्रीवादी भूमिका प्रगट होताना दिसत आहे. तसेच 'मानुषी' मिळून साऱ्याजणी वा स्त्रियांच्या अन्य काही मासिकांतून स्त्रीवादी कविता आता नियमितपणे दिसू लागल्या आहेत. प्रेम, घर या पूर्वीच्या सांकेतिक प्रतिमांना आता धक्के बसू लागले आहेत.

**प्रश्न ४ : तुमच्या कवितांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रयोगशीलता दिसते, त्यामागील आपली भूमिका काय?**

ठराविक फॉर्म नको, सर्वसामान्य वाचकांनाही ती पटदिशी समजावी, आजच्या स्त्रीचं गद्य आयुष्य मला वाचकांच्या मनावर ठसवायचं होतं. जीवनाचं रूपच बदललं, मग काव्याचं बदलायला काय हरकत आहे? म्हणून मग अट्टाहासानं नव्हे, पण विचारपूर्वक काही आकृतीबंध मी बदलले. माझी कविता ही अकविता वाटावी इतकी मी गद्य लिहिली. यादी, बातम्या, जाहिरात, स्वरूपात कविता लिहिली. या सर्वांमध्ये काहीतरी वेगळं करण्याची सनसनाटी प्रवृत्ती मुळीच नव्हती, तर उलट जास्त नेमकेपणानं वाचकांपर्यंत पोचण्याची खटपट होती आणि त्याची पावती अनेकदा मिळाली.

**प्रश्न ५ : तुमच्या कवितेत रोमँटिक प्रेम, स्त्रीस्वभावाचा हळुवारपणा व्यक्त होत नाही. नेमके काय कारण असावे?**

मी स्वत: शहरामध्ये लहानाची मोठी झाले, सुशिक्षित, नोकरी करणारी, मध्यम आर्थिक परिस्थितीतील, माझ्या सभोवतालची महानगरीय स्त्री नोकरी करणारी, घर, संसार, नोकरी सांभाळताना कामाचा प्रचंड ताण, गतीमान आयुष्य, नोकरीची ताबेदारी, जागेची टंचाई, वाढत्या खर्चाचं राहणीमान, सणवार, पाहुण्यांची सरबराई, वेळेची काटेकोर बंधनं, परंपरांची काचणी इत्यादी विविध दबावांखाली जगणाऱ्या स्त्रीच्या आयुष्यात कुठलं आलयं रोमँटिक प्रेम आणि प्रियाराधन, काव्यमयता आणि हळुवारपणा?

''देणे दिल्यासारखे ती देते शरीरही
रोजच्या कामाचा एक भाग म्हणून
तेव्हाही तिच्या मनात धावत असते
सात सत्तावन्नची फास्ट लोकल''

मी थांबले. त्यांचा उत्साह होताच पण मी निरोप घेताना त्यांच्या प्रसन्न, सात्त्विक, चेहऱ्यांवर फुललेल मंदस्मित माझी सोबत करत राहिलं... मनात उत्साह भरून आल्यासारखं!

(दि. ९ जुलै २००६)

★★★